| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br><br>**प्रेसनोट** | **2025**<br>**CB/ 40/2025** |

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक १०.०७.२०२५**

**सायबर पोलीस ठाणे, नवी मुंबई पोलीसांनी रू. २,२०,७०,०००/- व ७८,६३,०००/- च्या फसवणुक प्रकरणाचा छडा लावत राजस्थानी टोळीतील ०२ आरोपीताना अटक**

---------------------------------------------------------------------------

दिनांक १६/०४/२०२५ रोजी ते दिनांक ०३/०६/२०२५ रोजीचे कालावधीत आरोपींनी तक्रारदार यांचेशी संपर्क करुन, Bajaj Financial Securities Limited o UPSTOX या गुंतवणुक कंपन्यांमधुन बोलत असल्याचे सांगुन, बजाज फिनसर्व व अप स्टॉक्स यांचे नाव व लोगोचा वापर करून, त्यांच्या नावे बनावट कागदपत्र पाठवुन, ऑनलाईन शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणुक करून चांगल्या परताव्याचे अमिष दाखवुन, वेगवेगळया बॅक खात्यांची माहिती पाठवून, त्यावर ऑनलाईन रक्कम भरणा करण्यास सांगून, स्वत:चे फायदयासाठी लबाडीचे इरादयाने तक्रादार यांची गुंतवणुक मोठया परताव्यासह BFSLMAX व UPINSTITON या ॲपवर वर ऑनलाईन दर्शवून तक्रादार यांची एकुण रू. २,२०,७०,०००/- रुपयांची (दोन कोटी वीस लाख, सत्तर हजार रुपये) ची फसवणुक केली म्हणुन फिर्यादीने तक्रारीनुसार **<u>सायबर पोलीस ठाणे नवी मुंबई गुन्हा नंबर २९/२०२५ बीएनएस कलम ३१९(२),३१८(४),३(५) आय.टी ॲक्ट २००५ चे कलम ६६ डी अन्वये</u> गुन्हा दाखल आहे.**

दिनांक १०/०४/२०२५ रोजी ते दिनांक १८/०५/२०२५ रोजीचे कालावधीत आरोपींनी तक्रारदार यांचेशी संपर्क करुन शेअर्स ट्रेडींगमध्ये जास्त फायदा होत असल्याचे भासवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन तसेच जास्तीचा नफा मिळवुन देण्याचे अमिष दाखवुन ऑनलाईन पद्धतीने विविध बँक खात्यांमध्ये रक्कम भरण्यास सांगुन भरलेली रक्कम मोठ्या परताव्यासह ॲपवर दर्शवुन तक्रारदार तक्रादार यांची एकुण रू. ७८,६३,०००/- रुपयांची गुंतवलेली रक्कम परत न करता फसवणुक केली म्हणुन फिर्यादीने तक्रारीनुसार गुन्हा दाखल आहे. **<u>सायबर पोलीस ठाणे नवी मुंबई गुन्हा नंबर ३०/२०२५ बीएनएस कलम ३१९(२),३१८(४),३(५) आय.टी ॲक्ट २००५ चे कलम ६६ डी अन्वये</u> गुन्हा दाखल आहे.**

सदर गुन्हयांचा तपास वपोनि/अनिल पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आला. तपासा दरम्यान गुन्हयात फसवणुकीकरीता वापरलेल्या बॅक खात्याचे तसेच मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण केले असता, संशयीत आरोपी यांचा दोन गुन्हयांत सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. संशयीत आरोपी हे पुणे व मुंबई येथे असल्याची माहिती प्राप्त झाल्याने आरोपीत नामे :-

१) तुषार साळुंखे वय ३१, रा. काळेवाडी परिसर, चोवीसवाडी, चर्होली बुद्रुक, ता. हवेली, आळंदी ग्रामीण, पुणे यास पुणे येथुन दिनांक ०२/०७/२०२५ रोजी २०.५४ वा अटक केली.

२) मुकेश कुमार, वय ३४ वर्ष, रा- SVP नगर, चार बंगला, म्हाडा, अंधेरी (प), मुंबई मुळ रा. गाव सिगरा, ता. जि. झुंजुनु, राजस्थान यास मुंबई हद्दीतुन दिनांक ०५/०७/२०२५ रोजी १२.५० वा अटक करण्यात आली असुन आरोपी यांस ५ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर करण्यात आली आहे.

आरोपी यांचे ताब्यातुन ७ मोबाईल फोन, २ पासपोर्ट, १ पॅनकार्ड, १५ डेबिट कार्ड, ९ बँक खात्यांचे चेक बुक, १ पास बुक, १ रबरी स्टँप, ७ सिमकार्ड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला

आहे. अटक आरोपी यांचे इतर साथीदार राजस्थान येथे असल्याची माहिती प्राप्त झाली असुन त्याबाबत सायबर पोलीस ठाणे मार्फत तपास सुरू आहे.

सदरचा आव्हानात्मक सायबर गुन्हा श्री. मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री. संजय येनपुरे, सह पोलीस आयुक्त, श्री. दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, नवी मुंबई, श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री. अशोक राजपूत, सहाय्यक पोलीस आयुक्त, आ.गु.शा/सायबर, यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणेचे वपोनि/अनिल पाटील, पोउपनिरी/रोहित बंडगर, पोउपनिरी/राहुल कोळी, सपोफौ/विजय आयरे, पोशि/ एकनाथ बुरूंगळे, पोशि/नरहरी क्षिरसागर, मपोशि/पुनम गडगे यांनी उघडकीस आणला आहे. गुन्ह्यांचा तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोनि/विशाल पाटील, पोनि/गणेश जाधव करीत आहेत.

**नागरिकांना आवाहन**:-

आरोपीतांकडुन टेलिग्राम, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, फेसबुक तसेच इतर सोशल मिडीया वर शेअर्स मार्केट मध्ये गुंतवणुक करण्याची जाहिरात बनवुन मोठया प्रमाणात नफा मिळवण्याचे आमिष दाखवण्यात येते. त्यानंतर त्यांनीच बनविलेल्या वेबपोर्टल वर जास्तीचा फायदा दाखवुन जास्तीत जास्त गुंतवणुक करण्यास भाग पाडुन फसवणुक करतात.

याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, टेलिग्राम, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, फेसबुक तसेच इतर सोशल मिडीया वर शेअर्स मार्केट मध्ये गुंतवणुकीच्या जाहिरातींची खात्री करा, त्यांना आपली कोणतीही वैयक्तिक माहिती देवु नका व कोणतेही आर्थिक व्यवहार करू नका.

★★★★★★★★★★